

# महिषासुर मर्दिनी दुर्गा भवानी
# श्री सप्तशृंग निवासिनी श्री सप्तश्रृंगी माता

श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट | पी.टी.आर. नं. ए. ४६९

● ॐ सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके। शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ।। ●

## कुलदैवत किंवा कुलदेवी म्हणजे काय?


आई सप्तश्रृंगी


आई तुळजा भवानी


आई रेणुका


आई महालक्ष्मी


खंडोबा महाराज

प्रत्येक घराण्याचे एक कुलदेवी/कुलदैवत असते. बहुतेक घरांमधून लग्न, मुंज, वास्तु, मंगलकार्य अशा मोठ्या कार्यक्रमानंतर कुलदैवताला जाणे हा महत्त्वाचा भाग असतो.

**सर्व सामान्यपणे पडणारे प्रश्न?**

- कुलदैवत किंवा कुलदेवी म्हणजे काय?
- आपले कुलदैवत कोठे आहे?
- त्यांचे महत्व काय?
- कुलदैवतासंबंधी आपलं काय कर्तव्य आहे?



**हे सर्व प्रश्न दिवसेंदिवस अनुत्तरित राहतात. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे याची उत्तरे सांगणारी ज्येष्ठ मंडळी जवळ नसतात आणि घरात एखादी समस्या उध्दभवली की धावपळ सुरु होते.**

आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी ज्या देवतेची उपासना आवश्यक असते, अशा कुळातच भगवंत आपल्याला जन्माला घालतो. त्या देवतेला कुळाची कुलदेवता म्हणतात. आध्यात्मिक प्रगतीसाठी कुलदेवतेची उपासना कशी करावी, त्याविषयी शास्त्रीय माहिती जाणून घेतल्यास अध्यात्मात जलद प्रगती होते.

### कुलदेवता या शब्दाचा अर्थ !

'कुलदेवता' हा शब्द 'कुल' आणि 'देवता' या दोन शब्दांनी मिळून बनला आहे. कुळाची देवता ती कुलदेवता. **ज्या देवतेची उपासना केल्यावर मूलाधारचक्रातील कुंडलिनी शक्ती जागृत होते, म्हणजेच आध्यात्मिक उन्नतीला आरंभ होतो, ती देवता म्हणजे कुलदेवता.** कुलदेवता ज्या वेळी पुरुष देवता असते, त्या वेळी तिला 'कुलदेव' आणि जेव्हा ती स्त्री देवता असते, तेव्हा तिला 'कुलदेवी' म्हणून संबोधले जाते.

**कुलदेवतेची उपासना करुन आध्यात्मिक आणि व्यावहारिक उन्नती झाल्याचे सर्वज्ञात आहेत.**

## कुलदेवतेच्या उपासनेचे महत्त्व

शीघ्र ईश्वरप्राप्तीसाठी आपण ज्या देवतेची उपासना करणे आवश्यक असते, त्याच देवतेच्या कुळात ईश्वर आपल्याला जन्माला घालतो; म्हणून **आपल्या कुलदेवतेचा जप प्रतिदिन जसा वेळ मिळेल तसा अन् जास्तीत-जास्त म्हणजे सतत करावा.** समजा कुलदेवी आई सप्तशृंगी असेल, तर **"श्री सप्तशृंगीदेव्यै नमः"** किंवा **"सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिकेशरण्ये त्र्यंबके गौरी सप्तशृंगी नमोस्तुते"** असा नामजप करावा. विवाहित स्त्रीने सासरच्या कुलदेवतेचा नामजप करावा.

ब्रह्मांडात असलेली सर्व तत्त्वे पिंडात आली की, साधना पूर्ण होते. श्रीविष्णु, शिव आणि श्री गणपती यांसारख्या देवतांच्या उपासनेने त्या त्या देवतेचे विशिष्ट तत्त्व वाढते; परंतु ब्रह्मांडात असलेल्या सर्व तत्त्वांना आकर्षित करण्याचे सामर्थ्य केवळ कुलदेवतेच्या जपात आहे. त्याचप्रमाणे **कुलदेवता ही पृथ्वीतत्त्वाची देवता असल्याने तिच्या उपासनेपासून साधनेला आरंभ केल्यास उपासकाला कोणताही त्रास होत नाही.** ज्यांच्याकडे कुलदेव आणि कुलदेवी दोन्ही असतील, त्यांनी कुलदेवीचा नामजप करावा.

## कुलदेवता ठाऊक नसल्यास काय करावे ?

कुलदेवता ठाऊक नसेल, तर **'श्री कुलदेवतायै नमः'** असा नामजप करावा. हा नामजप श्रद्धेने केल्यास कुलदेवतेचे नाव सांगणारे कोणीतरी नक्कीच भेटते. **'श्री कुलदेवतायै नमः'** हा जप देवतेच्या तारक तत्त्वाशी संबंधित असल्याने **'कुलदेवता'** या शब्दातील **'दे'** हे अक्षर उच्चारतांना थोडेसे लांबवावे. यामुळे देवतेचे तारक तत्त्व जागृत होऊन त्या तत्त्वाचा आपल्याला लाभ होतो. **किंवा**

**मूळ स्वरुपातील दैवते:** ब्रह्मा, विष्णू, महेश, आदिमाया
**विष्णूची अवतार रुपातील दैवते:** नृसिंह, राम, कृष्ण, परशुराम
**शंकराची अवतार रुपातील दैवते:** कालभैरव, खंडोबा, मारुती
**आदिमायेची अवतार रुपातील दैवते:** सरस्वती, लक्ष्मी, पार्वती, दुर्गा, चंडी, काली
**शंकराच्या गणांचा मुख्य अधिपती, तसेच आरंभ पूजनाची देवता:** गणेश
**देवांचा सेनापती:** कार्तिकेय (दक्षिण भारतात यांना महत्त्व आहे. त्यांना अय्यप्पा म्हणतात.)
**वैदिक देवता:** इंद्र, अग्नी, वरुण, सूर्य, उषा (यातील सूर्य व अग्नी वगळता इतर दैवतांची उपासना आज प्रचलित नाही.)

**टीप: कुलदेवी/देवता माहित नसल्यास वरीलपैकी ज्या देवावर भक्ति आहे त्यांची उपासना करावी.**

यात अजुन **ग्रामदैवत, कुलदैवत, इष्टदैवत** वगैरे दैवतांचे प्रकार आहेत.

ग्रामदैवत ही संपूर्ण गावाचे दैवत, कुलदैवत हे कुळाचे आणि इष्टदैवत हे कोणतेही आवडणारे, आपल्यावर कृपादृष्टी ठेवणारे दैवत असते.

**महत्वाचे: कुलदेवी/कुलदैवत हे आपल्या काळाचे व वंशाचे संरक्षण करणारे दैवत असतात त्यासाठी वर्षातून एकदा तरी आपल्या कुलदेवी/कुलदैवत यांचे मूळस्थानी जाऊन दर्शन घ्यावे.**

**आई भगवतीचे थेट दर्शन घेण्यासाठी खालील बटनावर क्लिक करा.**

**LIVE DARSHAN**

**Source:** https://mahajanvinod.wordpress.com/ | https://www.sanatan.org/mr/a/663.html

देणगी

# एक देणगी श्री सप्तशृंगी निवासिनी देवी चरणी अर्पण

## आई भगवतीच्या चरणी दान अर्पण करण्यासाठी खाली दिलेल्या QR कोडला स्कॅन करा किंवा SBI Portal / Online Website Payment लिंक्सवर क्लिक करा:

Scan and Pay with any BHIM UPI app

PhonePe | Whatsapp | Freecharge | Google Pay | Paytm

HDFC bank | SBI pay | ICICI Bank | Axis pay | My airtel

Payment Via
**SBI Portal**

**PAY NOW**

Payment Via
**Online Website Portal**

**PAY NOW**

Q577O8486@ybl

**SHREE SAPTASHRUN NIWASINI DEVI TRUST**

**आई भगवतीच्या चरणी कमीत कमी रुपये १०१/- पासून सुरुवात करून आपण देणगी देऊ शकता.**

**टीप: देणगी देऊन आपण 80G अंतर्गत Income Tax मध्ये सवलत घेऊ शकता.**
**80G बद्दल अधिक माहितीसाठी पुढील पेजवर जा**

Visit: www.ssndtonline.org | Call: (02592) 253351 / 253249

## निधीचा तपशील

| अ.नं. | निधी | Funds |
|---|---|---|
| १ | मंदिर जीर्णोद्धार निधी | Temple Restoration Fund |
| २ | इमारत निधी | Building Funds |
| ३ | मेडिकल निधी | Medical Funds |
| ४ | जीवनदान निधी | Life Base Support Fund |
| ५ | इतर निधी | Other Fund |

## देणगीचा तपशील

| अ.नं. | निधी | देणगी (₹) | Funds |
|---|---|---|---|
| १ | अन्नदान देणगी | - | Annadaan Donation |
| २ | इतर पूजा देणगी | - | Other Pooja Donations |
| ३ | **पंचामृत अभिषेक देणगी** | **₹ ३,१००/-** | Panchamrut Abhishek Donation |
| ४ | नंदादीप (तेल) देणगी (१५ दिवस) | ₹ ७०१/- | Nandadeep (Oil) Donation (15 Day) |
| ५ | नंदादीप (तेल) देणगी (८ दिवस) | ₹ ५०१/- | Nandadeep (Oil) Donation (8 Day) |
| ६ | नंदादीप (तेल) देणगी (१ दिवस) | ₹ १०१/- | Nandadeep (Oil) Donation (1 Day) |
| ७ | **नंदादीप (तुप) देणगी (८ दिवस)** | **₹ ५०१/-** | Nandadeep (Ghee) Donation (8 Day) |
| ८ | दुग्ध अभिषेक देणगी | ₹ ३५१/- | Dugdh Abhishek Donation |
| ९ | ओटी पूजा साहित्य देणगी | ₹ ३०१/- | Outi Pooja Sahitya Donation |
| १० | संपुष्टीत पाठ्पुजा | ₹ ४०१/- | Sampushtit Pathpooja Donation |
| ११ | पल्लव पाठ पूजा देणगी | ₹ ३०१/- | Pallav Pathpooja Donation |
| १२ | सप्तशती पाठपूजा देणगी | ₹ २०१/- | Saptashati Pathpooja Donation |
| १३ | अभिषेक देणगी | ₹ १५१/- | Abhishek Donation |
| १४ | महानैवेद्य देणगी | ₹ १५१/- | Mahanaivedya Donation |

**Note: 80G Receipts is not available for religious objects like Pooja, Mahapooja or Abhishek**